# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७/का.७,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १८/०२/२०१७

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- दिव्यांग व्यक्तींना मतदान करता येणे शक्य व्हावे यासाठी मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरविण्याबाबत...

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दिनांक २७/०५/२०१५.

२. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.७२का.७, दिनांक २५/०१/२०१७.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भांकित अनुक्रमांक १ येथील दि.२७/०५/२०१५ च्या पत्रान्वये मतदान केंद्र निश्चितीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर पत्रातील परिच्छेद 3(x)(a) व (b) मध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द / अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी सोय नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

२. राज्य निवडणूक आयोगाने माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये होणाऱ्या १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम दि.११/०१/२०१७ रोजी जाहीर

केलेला आहे. या निवडणुकांमध्ये दिव्यांग व्यक्तींना मतदानाचा हक्क सुलभरितीने बजावता यावा यासाठी आवश्यक त्या सुविधा निश्चितपणे पुरविण्यात येतील याची दक्षता घेण्यात यावी असे आपणास आयोगाच्या संदर्भांकित अनुक्रमांक २ येथील पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

३. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जनहित याचिका क्र.७८/२०१४ मध्ये दि.०९/०२/२०१७ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. सदर आदेशामध्ये असे निर्देश देण्यात आले आहेत की, आयोगाच्या दि.२५/०१/२०१७ च्या पत्रात नमूद केलेल्या सुविधा सर्व मतदान केंद्रांवर परिणामकारकरित्या पुरविल्या जातील याची निवडणूक आयुक्तांनी खात्री करुन घ्यावी. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे सुविधा पुरविल्या न गेल्यास निवडणूक आयुक्तांविरुध्द न्यायालय योग्य ती कारवाई करेल असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

४. वरील परिस्थितीत आयोगाच्या दि.२५/०१/२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ देण्यात याव्यात. तसेच यामध्ये काही त्रुटी राहिल्यास त्यासाठी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल ही बाबदेखील त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी ही विनंती.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\MNC\L Corp Elec April 2018.docx.RSK

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH AT NAGPUR

**P.I.L. NO.78 OF 2014**

["Indradhanu" the non-Governmental Organization and others .vs. The Union of India and others]

| Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, Court's orders of directions and Registrar's orders | Court's or Judge's orders |
| --- | --- |

Shri A.J. Gilda, Advocate for the petitioners,
Shri A.M. Joshi, Advocate for respondent nos.1, 2, 11 and 14,
Shri D.P. Thakre, Additional Government Pleader for respondent nos.5, 6, 12 and 13,
Shri J.B. Kasat, Advocate for respondent no.7.

..........

CORAM : B.R. GAVAI AND KUM. INDIRA JAIN, JJ.

DATED : FEBRUARY 09, 2017.

In pursuance to our order dated 12.1.2017, pursis is filed on behalf of the Election Commissioner. Along with pursis, communication dated 25.1.2017 addressed to all the Collectors and the Municipal Commissioner has been annexed. The perusal of the said communication would reveal that directions have been issued to the Election Commissioner to provide facilities for different persons.

Shri Anup Gilda, the learned counsel for the petitioners, submits that though such circulars are issued, they are not followed.

We, therefore, direct the Election Commissioner to ensure that the facilities as provided in the communication dated 25.1.2017 are effectively provided by everybody.

Bombay High Court

We make it clear that in event the facilities as stipulated in the communication dated 25.1.2017 are not provided, this court may take such action against Election Commissioner as is found appropriate.

Stand over to 10.2.2017.

JUDGE JUDGE

Gulande, PA

Bombay High Court